महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग

# Government Medical College & Hospital, Sindhudurg

Near Civil Hospital, A/P.Oras, Ta.-Kudal, Dist. Sindhudurg

Phone No (02362 228355) Pin-416812 E-mail ID-deangmchsindhudurg@gmail.com

क्र.शांमवरसिं/वेतनदेयक/आयकरकपाती/ 2131 /२०२५ दि.28/05/२०२५

तातडीने दरपत्रक

**विषयः- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय ,सिंधुदुर्ग या संस्थेतील आयकर कपाती करण्याबाबत.**

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये शासकीय वैद्यकीय व महाविद्यालय ,सिंधुदुर्ग या संस्थेतील कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांचे दरमहा वेतनातून आयकर कपात तसेच नियोक्ता २४ मध्ये पगारातून कपात करण्यात आलेल्या आयकराचे (TDS रिटर्न भरावच्या असल्याने तातडीने करण्यासाठी दि. १३ /०५/२०२५ रोजी संस्थेच्या संकेतस्थळावर पुढील आठ दिवसाची (दि. २२/०५/२०२५ पर्यंत ची) मुदत देऊन प्रसिध्द करण्यात आली होती परंतू दिलेल्या मुदतीत एकच पुरवठा दाराकडुन दरपत्रक या संस्थेत सादर करण्यात आहे आहे तरी कमीत कमी तीन दरपत्रके सादर होणे आवश्यक असून पून्हा चार दिवसाची मुदत देऊन आपणाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरहू दरपत्रके लिफाफयातुन अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ,सिंधुदुर्ग येथे दिनांक02 /06/२०२५ रोजी सांयकाळी ५.३० वाजे पर्यत या कार्यालयात सादर करण्यात यावीत. विलंबाने सादर केलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

| आयकर कपात सेवा | | |
|---|---|---|
| 01 | Preparation Annual Salary Sheet of All Employees (12 Months' Salary Sheets ) Preparation of Form No 16 part A and part B | |
| 02 | Preparation of E-TDS Return Quarterly 26Q-Non Salary and Form 16A | |
| 03 | Preparation of GST TDS Return ( GSTR-7) | |
| 04 | Preparation of E-TDS Revised Return 24Q or 26Q | |

उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या आयकर कपाती दरपत्रक सादर करताना त्यावर अनुक्रमांक, नाव नमुद करण्यात यावे. तसेच या संस्थेस प्राप्त झालेले दरपत्रके खरेदी समिती समोर दिनांक03 /06/२०२५ रोजी १२.०० वाजता उघडण्यात येतील. आपणांस दरपत्रके उघडण्याच्या प्रक्रियेत भाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे.

Govt. Medical College and Hospital Sindhudurg

28.05.2025

डॉ.अनंत डवंगे

**अधिष्ठाता**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग

**अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सिंधुदुर्ग**

अटी व शर्ती

१. सदर दरपत्रक सिलबंद लिफाफयात देण्यात यावेत. तसेच लिफाफयावर सामुग्रीचे नाव नमुद करण्यात यावे.

२. सदरील दरपत्रके अधिकृत लेटरहेडवर सादर करावे. त्यासोबत व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी क्लिअरन्स सर्टिफिकेट, जीएसटी नंबर किंवा तत्सम प्राधिकरणाची नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत तसेच पॅन कार्ड प्रत, औषधीद्रव्ये विभागाची वैध मान्यता/परवानगी प्रमाणपत्र सदर सेवा पुरवठा करण्यास कंपनीने प्राधिकृत व वैध प्रमाणपत्र माहितीपत्रक (कॅटलॉग) इत्यादी माहिती सादर करणे बंधनकारक आहे.

३. प्रत्येक पुरवठाधारकास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल. तसेच वरील सर्व कामे ही एकाच फर्मच्या अखत्यारीत संघर्ष नसल्याबाबत तसेच एकल निविदा देण्याबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४. दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावाप्रमाणे असावेत.सदरच्या सेवेचे सर्व कर हे स्वंत्रपणे दर्शविण्यात यावे. तसेच उपरोक्त सेवा आदेश प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त आठ (०८) दिवसात सेवा पुरवण्यास सुरवात करावी.सदरील सेवा सूरु करण्यात विलंब झाल्यास देयकामधून नियमानुसार कपात करण्यात येईल.'

५. उपरोक्त नमुद सेवा हि उत्कृष्ठ असणे आवश्यक आहे.

६. सदर बाबीसाठी कोणत्यांही सेवेचे शासनाचे दरकरार उपलब्ध झाल्यास सदरील भरण्यात आलेले दरपत्रक वगळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

७. संबंधितांकडून सादरच्या सेवेचा मागील अनुभव असल्यास त्याची प्रत सोबत सांक्षाकित करून देण्यात यावे.

८. दरपत्रकांवर नमुद सेवेचा हमी कालावधी नमुद करावा.

९. शासकीय नियमानुसार दुसरा व चौथा शनिवार व रविवार, तसेच जोडून आलेली सार्वजनिक रजा वगळून दरपत्रके सादर करण्यात यावीत, याची नोंद घ्यावी. दरपत्रके पोस्टाने पाठविण्यात आल्यास स्विकारल्या जाणार नाहीत.

१०. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सिंधुदुर्ग यांना आहे.

११. सविस्तर अटी व शर्ती वाचूनच दरपत्रके भरण्यात यावेत.

प्रत-

स्वीय सहाय्यक शाखा ,श्रीम.प्रज्ञा परबकर यांनी सदरची जाहीरात संकेतस्थळावर दि१३/०५/ २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात यावी.